# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/10/2023 (सोमवार) दुपार

---

### जबरी चोरी

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा नवेगाव साधु शेत शिवार येथे दिनांक १५/१०/२०२३ चे ११.०० वा. ते ११.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे – मारोती धोंडबा मेश्राम, वय ७५ वर्ष, रा. नवेगाव साधु ता. उमरेड हे आपले पत्नीसह शेतातील घराबाहेर खुर्चीवर बसले असता त्या ठिकाणी काही दिवासा आधी फिर्यादीचे शेतातील घरी आलेला अनोळखी ईसम पुन्हा काळया रंगाची स्कुटी सारखी दिसणारी गाडी घेवुन फिर्यादीकडे आला व थोडी चर्चा करुन फिर्यादीचे पाठीमागुन येवुन अनोळखी ईसमाजवळ असलेली मिरची पावडर फिर्यादीचे दोन्ही डोळयांना लावल्याने फिर्यादी स्वत:चे डोळे चोळत असताना घटनास्थळी हजर असलेली फिर्यादीचे पत्नी नामे – सौ. राधा मारोती मेश्राम, वय ६२ वर्ष हिचे गळयात असलेली एक जुनी गरसोडी ज्यामध्ये सोन्याचे डोरले व सोन्याचे २० मनी तसेच काळे मनी असलेले अंदाजे ०५ ग्रॅम वजनाची व एक सोन्याची पोत ज्यामध्ये सोन्याचे पदक व १० सोन्याचे कारले मनी असलेले अंदाजे ५ ग्रॅम वजनाची सोन्याचे दागीने एकुण किंमती २०,०००/–रुपयाचा मुद्देमाल गळयातुन जबरीने हीसकावुन तेथुन पळुन गेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३९२ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रविन्द्र वाघ मो. नं. ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. सावनेर** :– दिनांक १५/१०/२०२३ चे १५.०० वा. दरम्यान पो.स्टे. सावनेर हद्दीत यातील फिर्यादी यांचा अल्पवयीन मुलगा वय १५ वर्ष हा दुकानात कामावर जातो म्हणुन कामावर जायचे आहे म्हणुन निघुन गेला दुपार पासुन फिर्यादीचा पिडीत मुलगा घरी परत न आल्याने त्याच्या मोबाईल क्रमांकावर फिर्यादीने कॉल केला असता पिडीत मुलाने फोन उचलला परंतु त्याचा स्पष्ट आवाज येत नव्हता. त्यानंतर पुन्हा त्याच्या मोबाईलवर संपर्क केला मोबाईल बंद येत आहे. म्हणुन फिर्यादीचे पिडीत मुलाला कोणीतरी अज्ञात ईसमाने पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लोखंडे मो. नं. ७७२१८१४३०० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**